### सिपना अभियांत्रिकी मध्ये पालक सभा व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार संपन्न

स्थानिक सिपना अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयातील प्रथम वर्ष अभियांत्रिकीच्या सर्व शाखेमधील विद्यार्थ्यांच्या पालकाची सभा नुकतीच यशस्वी रित्या संपन्न झाली . विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच उज्वल भवितव्यासाठी पालकांसोबत शिक्षकांची यशस्वी हितगुज करण्यात आली . सर्वप्रथम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश गावंडे ह्यांनी विद्यार्थी विकासासाठी महाविद्यालयाची असलेली भु मिका मांडली. त्याचप्रमाणे प्रथम वर्षाच्या शाखानिहाय अद्यावत प्रयोगशाळा व सुविधेबद्दल सुध्दा माहिती देण्यात आली.

आजच्या स्पर्धात्मक युगामध्ये विद्यार्थ्यांना तयार करायचे असेल तर त्यांना वेगवेगळ्या कौशल्यासाठी प्रशिक्षित ठेवावे लागेल व त्यानुसार सिपना अभियांत्रीकी महाविद्यालया तील प्रशिक्षण व आस्थापना विभाग अत्यंत सक्रियपणे कार्यरत आहे. ह्याच कारणे सिपना अभियांत्रिकीचे ह्यावर्षीचे कॅम्पस प्लेसमेंट अमरावती विद्यापीठ विभागात सर्वाधिक आहे असे प्रा. स्वप्नील पोतदार ह्यांनी नमूद केले.

ह्या पालक सभेच्या निमित्याने अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रम समन्वयक प्रा . डॉ. अजय ठाकरे ह्यांचे माध्यमातून बी.ई. प्रथम वर्षाच्या सर्व विभागामधून वेगवेगळ्या शाखेतून प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांचा त्यांच्या पालकासोबत सत्कार करण्यात आला, ज्यामध्ये प्रथम वर्ष स्थापत्य अभियांत्रिकीच्या कु. साक्षी नितीनराव रिठे ह्या मुलीला १० पैकी १० मार्क्स मिळाल्याने तिचा विशेष बहुमान करण्यात आला.

पालक व पाल्याचा दुरावा कमी व्हावा व त्याच्यामध्ये सुसंवाद व्हावा ह्या दृष्टीने विद्या र्थी उपक्रम अधिष्ठाता डॉ. प्रवीण मळसने ह्यांनी यथोचित मार्गदर्शन केले.

पालक प्रतिनिधी म्हणून श्री . हेमंतजी घुमाळे उपस्थित होते . चर्चेदरम्यान अनेक पालकांनी सिपना अभियांत्रिकी महाविद्यालयाची शिस्त , येथील विद्यार्थी उपयोगी स्तुत्य कार्यक्रम व सर्वात महत्वाचे म्हणजे सर्वाधिक विद्यार्थ्यांचे होणारे प्लेसमें ट ह्याबद्दल सर्व सिपना परिवाराचे व परिवार प्रमुख श्री . जगदीशभाऊ गुप्ता ह्यांचे अभिनंदन केले. अनेक पालकांनी विद्यार्थ्यांवर अजून थोडे जास्त लक्ष देण्यासाठी उपस्थित पालकासोबत आपसात चर्चा करून सूचना दिल्या व सोबतच उपस्थित शिक्षकाना सुध्दा त्यासाठी विनंती केली.

कार्यक्रमाचे मंचसंचालन आपल्या पारिवारिक शैलीत डॉ . निलेश कासट ह्यांनी केले व आभार प्रदर्शन प्रा . आरती पांडे ह्यांनी केले . कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित पालकांनी वेगवेगळ्या विभागाचे ग्रंथालय व उपलब्ध सर्व सुविधांचे अवलोकन केले. कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी डॉ. बोरीकर, प्रा. खरबडे, प्रा. कुरवाडे, प्रा. अश्विन पंड, प्रा. गाडगे, प्रा. राठोड व श्री. सुनील कोरडे ह्यांनी अथक परिश्रम घेतले.




